# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

ग्राहक तक्रार क्र. २६/२०१४ दि. २५.०९.२०१४

| | |
|---|---|
| कै. यशवंत महादेव संसारे (मयत)<br>वारसदार श्री. ओंकार यशवंत संसारे<br>मु.पो. शृंगारतळी, ता.गुहागर<br>जिं.रत्नागिरी | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता, महावितरण<br>विभागीय कार्यालय चिपळूण | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर,<br>अध्यक्ष<br>२) श्री. व्ही. बी. जगताप,<br>सचिव तथा कार्यकारी अभियंता<br>३) श्री. ज. पु. बिवलकर<br>सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | १) ओंकार यशवंत संसारे<br>२) श्री. शशिकांत यशवंत वैद्य( प्रतिनिधी ) |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | १) श्री. मकरंद देवेंद्र आवळेकर<br>कार्यकारी अभियंता, चिपळूण<br>२) श्री. कैलास पांडुरंग लवेकर<br>उपकार्यकारी अभियंता गुहागर<br>३) श्री. रामचंद्र बापूसाहेब देसाई<br>सहाय्यक अभियंता गुहागर |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

१) क) श्री. ओंकार यशवंत संसारे रा. जानवळे, वाणेवाडी, ता.गुहागर,जि.रत्नागिरी यांचा मु.पो. शृंगारतळी, ता.गुहागर येथे 'हॉटेल हेमंत' या नावाने हॉटेल व्यवसाय आहे. हा व्यवसाय श्री. ओंकार संसारे यांचे वडील श्री. यशवंत महादेव संसारे हे सन १९८७ पासून चालवीत होते त्यांचे दि.१९.०१.२०१४ रोजी निधन झाल्यानंतर श्री. ओंकार संसारे वारस म्हणून सदर व्यवसाय मालकीने चालवीत आहेत. या व्यवसायासाठी सन २००९ मध्ये एक वीज जोडणी घेण्यात आली असून त्याचा ग्राहक क्रमांक २२५०७००११०४४ असा आहे हा वीज पुरवठा उद्योगधंदयासाठी घेतला असून त्याचा वापरही हॉटेल व्यवसायासाठीच करण्यात येत आहे दि.२५.०३.२०१४ रोजी महावितरणच्या अधिकाऱ्यानी व्यवसायाचे जागी भेट देऊन मीटरची तपासणी केली. त्यानंतर एप्रिल २०१४ मध्ये दूरध्वनीवरुन गुहागर येथील कार्यालयात बोलावून दि.२५.०३.२०१४ ची प्रोव्हिजनल ऑर्डर दिली त्यामध्ये संदर्भित वीज जोडणीमधून मिळालेल्या वीज पुरवठयाचा अनधिकृत वापर केल्याचा आरोप लावण्यात आला असून रु.३७९८५०/-इतकी रक्कम भरण्यास कळविले. श्री. ओंकार संसारे यांनी या आकारणीस आक्षेप घेतल्यानंतर दि.०९.०५.२०१४ चा अंतिम आकारणी आदेश देण्यात आला व आकारणीत वाढ करुन रु.१४८०८५५/- इतकी मागणी करण्यात आली.

ख) सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर वीज पुरवठा खंडीत करण्याची शक्यता आहे असे वाटल्याने मंचाकडे दि.२८.०५.२०१४ रोजी नमुना 'अ' मध्ये तक्रार दाखल करण्यात आली. दि.२४.०६.२०१४ रोजी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी ग्राहक तक्रार, मंचाच्या आधी, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे केली नसल्याचे आढळले व थेट मंचाकडे तक्रार दाखल करण्यास संयुक्तिक कारण ग्राहकातर्फे देण्यात न आल्याने सदर तक्रार कक्षाकडे वर्ग करण्याचा आदेश दिला. ग्राहकानेही यास संमती दिली.

ग) मंचाच्या आदेशाप्रमाणे दि.०२.०६.२०१४ रोजी तक्रार वर्ग झाल्यानंतर दि.२०.०८.२०१४ रोजी सुनावणी घेऊन कक्षाने दि.२७.०८.२०१४ रोजी आदेश दिला. सदर प्रकरण विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ अंतर्गत येत असल्याचे कारण देऊन कक्षाने तक्रार फेटाळली.

घ) कक्षाच्या आदेशाने समाधान न झाल्याने ग्राहकाने मंचाकडे दि.२५.०९.२०१४ रोजी नमुना 'अ' मध्ये सध्याची तक्रार दाखल केली आहे.

२) ग्राहक तक्रारीचे थोडक्यात स्वरुप असे आहे की मु.पो. शृंगारतळी येथे असलेल्या हेमंत हॉटेल या व्यवसायाचे जागी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली असता वीज जोडणीचे वर्गीकरण औद्योगिक (LTV A) असे करण्यात आले असले तरी वापर वाणिज्यिक कारणासाठी होत आहे असे आढळले मीटर तपासणी अहवालामध्ये तसे नमूद करण्यात आले आहे. मात्र त्यानंतर महावितरणच्या निर्धारण अधिकारी यांनी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ प्रमाणे कारवाई सुरु करुन अनधिकृत वापरासाठी रु. ३७९८५०/- इतकी आकारणी करुन रक्कम भरण्यास ग्राहकास कळविले. सदर आकारणी करण्यापूर्वी कलम १२६ प्रमाणे आवश्यक बाबींची पूर्तता केली नसल्याचे नमूद करुन कारवाई अवैध आहे असा आक्षेप ग्राहकातर्फे घेण्यात आला तसेच वीज पुरवठा हॉटेल व्यवसायासाठी घेण्यात आला व त्याच कारणाने वापर होत असल्याचे स्पष्ट करुन आकारणी रद्द करण्याची विनंती केली. ग्राहकाच्या आक्षेपाच्या पत्रानंतर निर्धारण अधिकारी यांनी अंतिम आदेश पारित करुन आकारणीत वाढ करुन रु. १४८०८५५/- इतकी रक्कम भरण्यास कळविले. या आकारणीला आव्हान देण्यात आले असता अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने ग्राहकाचे आक्षेप फेटाळले व कलम १२६ प्रमाणे कारवाई करण्यास मुभा दिली. निर्धारण अधिकाऱ्यांच्या आकारणी विरोधात व कक्षाच्या आदेशाविरोधात ही तक्रार मंचाकडे दाखल झाली आहे.

३) तक्रार प्राप्त झाल्यानंतर दि.२९.०९.२०१४ च्या पत्र क्रं.१५१ प्रमाणे कार्यकारी अभियंता चिपळूण, जि. रत्नागिरी यांचकडून तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण मागविण्यात आले त्याप्रमाणे दि. ०३.११.२०१४ च्या पत्र क्रं. ४१२२ अन्वये स्पष्टीकरण सादर करण्यात आले.

४) क) आयोगाच्या विनियमातील तरतुदींप्रमाणे उभय बाजूना नोटीस पाठवून दि.१८.११.२०१४ रोजी सुनावणी घेण्यात आली सुनावणी दरम्यान ग्राहकातर्फे श्री. ओंकार यशवंत संसारे व प्रतिनिधी श्री. शशीकांत यशवंत वैद्य उपस्थित राहिले व महावितरणतर्फे श्री. मकरंद दे. आवळेकर कार्यकारी अभियंता, चिपळूण, श्री. कैलास चां.लवेकर उपकार्यकारी अभियंता गुहागर व श्री. रामचंद्र बा. देसाई सहाय्यक अभियंता गुहागर हे उपस्थित होते.

ख) ग्राहकाचे बाजूने प्रतिनिधी श्री. वैद्य यांनी त्याच्या लेखी म्हणण्यातील मुद्देच प्रतिपादन केले त्यानी कथन केले की वीज मागणी उद्योगधंदयासाठीच करण्यात आला होता. यासाठी महावितरणचा जो विहीत नमुना सादर केला त्यावर याबद्दलचा स्पष्ट उल्लेख आहे. वीज वापर हॉटेल व्यवसायासाठीच केला आहे. अर्जामधे खाजगी पिण्याचा पाण्यासाठी असा उल्लेख केला कारण हॉटेल व्यवसायासाठी पिण्याचे पाणी मोठया प्रमाणात लागते. या पाण्याचा वापर घरगुती कारणासाठी वा विक्रीसाठी केला नाही. महावितरणने तसा आरोपही केलेला नाही. मागणी अर्जानुसार वीज पुरवठा करताना महावितरणने जोडणीचे वर्गीकरण 'औद्योगिक' असे स्वतःच केले आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रार वीज कायदा २००३ च्या कलम १२६ अंतर्गत असल्याचे नमूद करीत तक्रार फेटाळली आहे. कक्षाच्या निर्णयाने समाधान न झाल्याने ही तक्रार मंचाकडे केली आहे. कारण वीज वापर अनधिकृत नव्हता व नाही.

ग) महावितरणच्या वतीने श्री. आवळेकर कार्यकारी अभियंता यांनी कथन केले की तक्रार प्रकरणी महावितरणचे म्हणणे स्वतंत्र पत्राव्दारे मंचाकडे सादर केले आहे. प्रत्यक्ष सुनावणीदरम्यान त्यांनी असे सांगितले की पिण्याच्या पाण्यासाठी घेतलेल्या जोडणीचा वापर हॉटेल व्यवसायासाठी केला आहे व म्हणून तो अनधिकृत वापर आहे घरगुती पाण्याचा वापर किंवा पाणी विक्रीही असू शकते. जोडणीचे वर्गीकरण 'औद्योगिक' असे केले ते त्यावेळच्या प्रचलित नियमांप्रमाणे केले. या नियमासंबंधीचे परिपत्रक दाखल करण्याची मंचाने सूचना केली व दि.२५.११.२०१४ पर्यंत मुदत मुदत दिली. श्री. आवळेकर यांनी त्याप्रमाणे पूर्तता करण्याचे आश्वासन दिले.

घ) मंचाच्या सूचनेप्रमाणे दि. २१.११.२०१४ च्या पत्र क्रं. ४३३१ मध्ये विद्युत जोडणीची वर्गवारी 'औद्योगिक' करण्याची कारणे नमूद केली असून त्या पत्रासमवेत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मान्यता दिलेले व दि.०१.०५.२००७ पासून लागू केलेले दर दर्शविणारे पृष्ठ क्रं. २०६,२०८,२०९ व २१० जोडले आहेते. महावितरणच्या म्हणण्यानुसार ग्राहकाने शेती पंपासाठी मागणी केलेली नाही वा गाव नमुना ७/१२ चा उतारा जोडलेला नाही, पाण्याचा उपसा खाजगी पिण्याच्या पाण्यासाठी होणार असे नमुद आहे व यामुळे प्रस्तुत तक्रार विषयाची जोडणी शेती पंप वा घरगुती या सदराखाली येत नाही. आयोगाच्या दरपत्रकातील अनु. क्रं. LT II Non Domestic मधील तरतुदीनुसार १ अश्वशक्ती पर्यंत वाणिज्यिक वर्गवारी देणे आवश्यक होते परंतु मागणी ३ अश्वशक्ती असल्याने मोटिव्ह पॉवर अंतर्गत औद्योगिक जोडणी दिली आहे.

५) (क) उभय बाजुकडून दाखल झालेले स्पष्टीकरण/म्हणणे तसेच अन्य दस्तऐवज, तोंडी युक्तिवाद लक्षात घेता मंचासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात.

१) प्रस्तुत प्रकरणी महावितरणच्या अधिकाऱ्यानी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ प्रमाणे कारवाई केली असली तरीही प्रस्तुत तक्रार विचारात घेण्याचा मंचाला अधिकार आहे काय?

२) प्रस्तुत प्रकरणी वीज कायदा २००३ चे कलम १२६ लागू होते काय? व महावितरणने केलेली रु. १४८०८५५/- इतकी आकारणी वैध आहे काय?

(ख) महावितरणने असे नमुद केले आहे की महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच च विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.८ प्रमाणे कलम १२६ नुसार केलेली कारवाई मंचाच्या कार्यक्षेत्रात येत नाही. या संदर्भात आयोगाच्या विनियमांचे कलम ६.८ पहाणे आवश्यक आहे ते खालीलप्रमाणे आहे.

If the Forum is prima facie of the view that any grievance referred to it falls within the purview of any of the following provisions of the Act the same shall be excluded from the jurisdiction of the Forum.

a) Unauthorized use of electricity as provided under section 126 of the Act.

b) …………………..

वरील तरतुदीचे नीट वाचन केल्यास असे आढळते की ग्राहकाचे ग्राऱ्हाणे वीज कायद्याच्या कलम १२६ अंतर्गत आहे असे मंचाचे सकृतदर्शनी मत झाले तर ते मंचाच्या कार्यक्षेत्रातून वगळले जाईल. अर्थात विशिष्ट गाऱ्हाणे विचारात घेऊन ते कलम १२६ अंतर्गत येते किंवा नाही हे ठरविण्याचा मंचाला अधिकार आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी तक्रार विचारात घेऊन कार्यक्षेत्राच्या मुद्दयाबाबत निर्णय घेण्याचा मंचाला अधिकार आहे.

(ग) महावितरणच्या पथकाने दि. २६.०३.२०१४ रोजी ग्राहकाचे व्यवसायाच्या ठिकाणी भेट दिली व मीटरची तपासणी केली. व मीटर तपासणी अहवालाची प्रत ग्राहकाला दि.२१.०४.२०१४ रोजी सुनावणीच्या वेळी दिली असे ग्राहकाच्या तक्रारीबाबतच्या लेखी म्हणण्यावरुन आढळते. महावितरणने हा अहवाल सुनावणीच्या आधीच दिल्याचे नमुद केले असले तरी निश्चित तारीख नमुद केलेली नाही किंवा ग्राहकाची पोचपावती दाखल केलेली नाही.

(घ) ग्राहकाने दि.३०.०४.२०१४ च्या पत्राने कारवाईला लेखी आक्षेप घेतला त्यामधे स्थळ परीक्षण अहवालाची प्रत दिलेली नाही असे नमूद असतानाही महावितरणने दि.१८.०६.२०१४ च्या पत्र क्र. २५१२ मधे मुद्दा क्रं.१३ वर मीटर तपासणी अहवालच स्थळ परीक्षण अहवाल म्हणून ग्राहय धरण्यात आला आहे असे नमुद केले आहे. दि.०३.११.२०१४ च्या पत्र क्र. ४१२२ चा मुद्दा क्रं. १७ वर मीटर तपासणी अहवाल /स्थळपरीक्षण अहवाल ग्राहकाच्या समक्ष तयार केल्याचे नमुद आहे. मीटर तपासणी अहवाल व स्थळ परीक्षण अहवाल हे वेगवेगळे दस्तऐवज असून त्याचा हेतूही वेगवेगळा आहे. मीटर तपासणी अहवालच स्थळपरीक्षण अहवाल असल्याचे महावितरणचे म्हणणे मान्य करता येत नाही . अर्थात् महावितरणची संपूर्ण कारवाई मीटर तपासणी अहवालावर आधारित आहे हे स्पष्ट आहे. दि.२५.०३.२०१४ च्या मीटर तपासणी अहवालामध्ये खालील उल्लेख आहे.

१) Error found :- meter tariff change

२) तपासनीस यांचे खुलासे :- मीटर टॅरिफ LTVA असे बीलावर येत आहे. वापर कमर्शिअल असून 'Tariff Change' आहे. तपासणी अहवालामधे अनधिकृत वापराबद्दल कोणताही उल्लेख नाही. किंबहुना 'मीटर टॅरिफ LTVA बीलावर येत आहे ' यावरुन हे स्पष्ट आहे की LTVA असे वर्गीकरण महावितरणनेच केले होते.

(ड.) ग्राहकाच्या वीज मागणी अर्जाची प्रत (पत्र क्रं.४१२२ चे जोडपत्र क्रं.२) महावितरणने दाखल केली आहे. तिचे अवलोकन करता असे आढळते की अर्जाच्या पान क्रं.२ वर खालीलप्रमाणे मथळा आहे.

'सध्या अस्तित्वात असलेल्या लोडसह ५० किलो वॅटस्पर्यंत लहान प्रमाणावरील उदयोगद्यंदयाकरीता असलेल्या विद्युतशक्ती करीता करावयाचा अर्ज'

यावरुन हे स्पष्ट दिसते की ग्राहकाने मार्च २००८ मध्ये केलेली वीज पुरवठयाची मागणी उद्योगासाठीच केली होती. अर्जामध्ये मुद्दा क्रं.११ वरील' खाजगी पिण्याच्या पाण्यासाठी' हा उल्लेख हॉटेल धंद्याशी संबंधित नाही हे महावितरणचे म्हणणे तर्कसंगत नाही व मान्य करण्यासारखे नाही. महावितरणने दाखल केलेल्या ग्रामपंचायतीच्या दि.१५.०३.२०१४ च्या नाहरकत दाखल्यामध्ये इमला क्रं.७० अ मध्ये लाईट मीटर देण्यास हरकत नसल्याचे नमूद आहे. या आधी उल्लेख केलेल्या जोडपत्र क्रं.२ मध्येही घर नं. ७०अ/ मु.पो. शृंगारतळी नमूद आहे तसेच महावितरणच्या मंजुरीच्या पत्रामध्येही घर क्र. ७० अ असाच नमूद असून या इमल्यामध्ये ग्राहकाचा हॉटेल व्यवसाय आहे याबद्दल उभयपक्षी वाद नाही. ग्राहकाने स्वतःचे निवासस्थान व्यवसायाचे ठिकाणापासून दूर वाणेवाडी जानवली येथे असल्याचे दि. १८.११.२०१४ च्या लेखी म्हणण्यामध्ये नमूद केले आहे व त्याविषयी महावितरणने आक्षेप नोंदलेला नाही. अर्थात् महावितरणने मंजुरी दिलेला वीज पुरवठा हॉटेल व्यवसायासाठी होता याची पूर्ण माहिती महावितरणच्या अधिकाऱ्याना होती. संदर्भित वीज जोडणीचे वर्गीकरण 'औद्योगिक' असे असल्याचे मंजुरी पत्रात नमूद आहे व त्या वर्गीकरणानुसार दर आकारणी करण्यात येत होती. यामध्ये ग्राहकाचा दोष नाही.

(च) महावितरणकडून दाखल केलेल्या दि.०९.०५.२०१४ च्या अंतिम आदेशाच्या परिशिष्ट -१ मध्ये ग्राहक क्रं. २१५०७००११०४४ चे वर्गीकरण LT- Ind असे असल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. तसेच ग्राहकाचा 'हॉटेल हेमंत' बाजारपेठ, शृंगारतळी हा व्यवसाय तेथे असल्याचेही नमूद आहे.

ग्राहकाकडून सदंर्भित वीज जोडणीचा वापर घरगुती/ सार्वजनिक पाणीपुरवठयासाठी वा पाणी विक्रीसाठी होत असल्याचा कोणताही पुरावा महावितरणने दिलेला नाही. त्यामुळे वीज पुरवठा उद्योगधंदयासाठीच केला होता मात्र वर्गीकरण 'वाणिज्यिक' ऐवजी 'औद्योगिक' असे केले व त्यानुसार दर आकारणी केली असे दिसते.

(छ) मंचाच्या सूचनेप्रमाणे महावितरण चिपळूण विभागाकडून दि.२१.११.२०१४ च्या पत्र क्रं. ४३३१ अन्वये खाजगी पिण्याच्या पाण्यासाठी औद्योगिक वर्गवारी करण्याची कारणे देण्यात आली आहे ती याप्रमाणे आहेत.

१) ग्राहकाने शेती पंपासाठी मागणी केलेली नाही.

२) कूप नलीकेचा पाणी उपसा खाजगी पिण्याच्या पाण्यासाठी होणार असल्याचे अर्जात नमूद केले आहे.

३) शेतीपंप वा घरगुती या सदराखाली वीज जोडणी येत नसल्यामुळे आयोगाने मान्यता दिलेल्या दि.०१.०५.२००७ पासूनच्या दरपत्रकातील LT- II Non domestic मधील तरतुदीनुसार १ अश्वशक्तीपर्यंत वाणिज्यिक वर्गवारी देणे आवश्यक होते परंतु ग्राहकाची मागणी ३ अश्वशक्तीची असल्याने Motive Power अंतर्गत औद्योगिक वर्गवारी देण्यात आली.

महावितरणच्या मुद्दयांचे नीट वाचन केल्यास असे आढळते की

१) संदर्भित जोडणी शेतीपंप वा घरगुती या सदराखाली येत नाही असे महावितरणने स्वतःच मान्य करुन आयोगाच्या मान्यता प्राप्त दरपत्रकाप्रमाणे LT-II असे वर्गीकरण करणे आवश्यक होते असे नमुद केले आहे. LT-II Non domestic ( बिगर घरगुती ) वर्गवारी कोणाला लागू होते ( Applicability) याबाबत खालील मजकूराचा महावितरणने संदर्भ दिला आहे.

*"Power supply used for appliances like light, fans, refrigerator, heaters, small cookers, radios, T.V. sets, battery charger equipments, x-ray*

*machines ,small motors up to 1 HP attached to appliances and domestic water pump in following places:*

a) Non-domestic, Commercial & Business premises,

b)Hospital, other than those mentioned at LT-I,

c) Hostels, other than those mentioned at LT-I,

या तरतुदीप्रमाणे १ अश्वशक्तीपर्यंत वाणिज्यिक वर्गवारी देणे आवश्यक होते मात्र ग्राहकाची मागणी ३ अश्वशक्तीची असल्यामुळे मोटिव्ह पॉवर अंतर्गत औद्योगिक वर्गवारी दिली असे चुकीचे प्रतिपादन केले आहे. तरतुदीमधील small motors upto 1 H.P. attached to appliances हा उल्लेख घरगुती पाण्याच्या पंपासाठीही लागू होतो असा चुकीचा अर्थ लावण्यात आला. १ अश्वशक्तीची मर्यादा घरगुती पाण्याच्या पंपासाठी नाही. अशी मर्यादा अभिप्रेत असती तर १ अश्वशक्तीपेक्षा अधिक क्षमतेच्या पाण्याच्या पंपासाठी स्वतंत्र दर निश्चित केले असते. तसे केलेले नाही. १ अश्वशक्तीपेक्षा अधिक क्षमतेच्या पंपासाठी कोणतेच दर नाहीत असे म्हणणे तर्कसंगत नाही. याविषयी सविस्तर विवेचन मा. विद्युत लोकपाल यांचेकडील अभिवेदन क्रं.३२/२००७ संबंधातील लोकपालांच्या आदेशात केले आहे. मा. लोकपालांच्या आदेशातील मजकुर खालीलप्रमाणे आहे.

*In this context......... the words 'small motors upto 1 H.P. attached to appliances' and 'water pump in following places' are separated by the word 'and'. This makes it clear that the limit of 1.H.P. applies to small motors attached to appliances and not to water pump in LT-1category. Similar provision exist for LT-2 (non domestic category) where the appliances using motors upto 1 H.P. as well as domestic water pump are charged LT-2 tariff because they are used in non domestic, commercial, and business premises. Harmonious reading of the provision in both the tariff orders would lead to demonstrate that it is the location of the premises where domestic water pump is used that governs the tariff and not the H.P. of the pump..... Tariff Provisions'*

या विवेचनात दि. ०१.१०.२००६ पासून लागू झालेल्या आयोगाच्या आदेशाचा संदर्भ असला तरी दि.०१.०५.२००७ पासून लागू झालेल्या आदेशातील LT-2 विषयीच्या तरतूदीच्या (applicability)

मजकूरात कोणताही बदल नाही. LT - 2 (non domestic) वर्गवारीत 1-HP पेक्षा अधिक क्षमतेच्या पाण्याच्या पंपासाठी दर निश्चित झालेला नसल्यामुळे Motive Power चा दर लावला या म्हणण्याला Tariff Order मध्ये आधार नाही. ग्राहकाकडून अनधिकृत वापर झाल्याचे सिध्द करण्यात महावितरणला यश आलेले नाही.

अर्थात् १ अश्वशक्तीऐवजी ३ अश्वशक्तीची मागणी असल्यामुळे 'औद्योगिक' दराने आकारणी केली हे म्हणणे मान्य करता येत नाही.

प्रस्तुत प्रकरणी वाणिज्यिक दराऐवजी औद्योगिक दर लावला हे महावितरणने मान्य केले असून यामधे ग्राहकाचा कोणताही दोष आढळत नाही.

(ज) लघुदाबदरपत्रकाप्रमाणे (Low Tension Tariff) ज्या ठिकाणी पाण्याच्या पंपासाठी घरगुती दराने आकारणी लागू होते त्या 'ए' ते 'आय' प्रकारामध्ये ग्राहकाची व्यवसायाची जागा अंतर्भूत होत नाही. त्यामुळे विषयाधीन जोडणीसाठी घरगुती दर लागू होत नाही.

(झ) ग्राहकाकडून वीजेचा वापर हॉटेल व्यवसायासाठी केला जात होता म्हणून असा वापर वीज अधिनियम २००३ मधील कलम १२६ (B) (IV) प्रमाणे अनधिकृत वीज वापर ठरतो असे महावितरणचे म्हणणे पटण्यासारखे नाही. संदर्भित वीज जोडणी उद्योगधंदयासाठी मागण्यात आली होती व त्यामधून होणारा वीज वापर हॉटेलच्या धंदयासाठी वापरणे अनधिकृत नाही. वीज वापराचा हेतू (purpose of usage) वाणिज्यिकच असल्याने अनधिकृत वापर झाला असे म्हणता येत नाही.

(ञ) महावितरणने संदर्भ दिलेल्या अन्य तक्रार प्रकरण ३/२०१२ संबंधी या मंचाचा आदेश अशाच प्रकारच्या प्रकरणामध्ये नव्हता. या प्रकरणी घरगुती जोडणीचा वापर व्यावसायिक कारणासाठी होत होता व त्यामुळे निश्चितच वीज वापर अनधिकृत होता. श्री. संसारे यांच्या प्रकरणी मुळातच जोडणी वाणिज्यिक कारणासाठी मागण्यात आली होती व त्याचा वापर वाणिज्यिक कारणासाठी केला आहे. त्यामुळे प्रकरण क्रं. ०३/२०१२ मधील वस्तुस्थिती पूर्णपणे भिन्न असल्याने त्याबाबतीतला निर्णय प्रस्तुत प्रकरणी लागू होत नाही.

(ट) ग्राहकाने कमी दराच्या वीजेचा अधिक वापर केला यात आक्षेपार्ह काहीही नाही. कोणतीही सामान्य बुध्दीची व्यक्ती हेच करील. उलटपक्षी एक जोडणी आधीच दिलेली असताना दुसरी जोडणी त्याच व्यवसायासाठी देताना तिचे वर्गीकरण औद्योगिक असे केले ही महावितरणच्या अधिकाऱ्यानी चूक केली असे दिसते. एका जोडणीचा वापर कमी होत असल्याचे बिलींग विभागाच्या लक्षात न येणे हे निष्काळजीपणे काम केल्याचे द्योतक आहे. त्यासाठी ग्राहकाला जबाबदार धरणे अयोग्य आहे.

वरीलप्रमाणे विवेचन लक्षात घेता ग्राहकाकडून वीजेचा अनधिकृत वापर झाला असे आढळत नाही. महावितरणने दि. ०९.०५.२०१४ च्या आदेशाने केलेली रु. १४८०८५५/- ची मागणी बेकायदेशीर असून ती रद्द करणे उचित ठरेल.

(६) वीज कायदा २००३ मधील कलम १२६ अंतर्गत केलेल्या कारवाईबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे गैरलागू असून ते व ग्राहकाचे आक्षेपही विचारात घेण्याची आवश्यकता नाही असे मंचाचे मत आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षानेही याप्रकरणी दिलेला आदेश चुकीचा असून रद्द होण्यास पात्र आहे, म्हणून रद्द केला आहे.

(७) तक्रार अर्जासमवेत जोडलेल्या जोडपत्राच्या पान क्रं. ४ वर ग्राहकाने एप्रिल २०१४ पासून 'औद्यागिक' ऐवजी वाणिज्यिक दराने आकारणी केल्याचे व त्याप्रमाणे देयकांची रक्कम जमा केल्याचे नमूद केले आहे. आकारणीतील या बदलास ग्राहकाची संमती आहे. मात्र वर्गीकरण बदलाविषयी ग्राहकाला पूर्वसूचना दिलेली नाही ग्राहकाचे म्हणणे मांडण्याची संधी दिलेली नाही.

मंचाचे सदस्य सचिव वैद्यकीय रजेवर असल्याने प्रस्तुत प्रकरणी निर्धारित मुदतीत आदेश देता आला नाही.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेता मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**१) महावितरणची कलम १२६ अंतर्गत सुरु केलेली कारवाई रद्द करण्यात येत आहे .**

**२) कलम १२६ अंतर्गत कारवाईच्या अनुषंगाने केलेली रु. १४८०८५५/-(रु. चौदा लाख ऐंशी हजार आठशे पचावन्न मात्र) ची मागणी रद्द करण्यात येत आहे.**

**३) महावितरणच्या चुकीच्या कृतीमुळे ग्राहकाला कराव्या लागलेल्या रु. ११६/- (रु. एकशे सोळा फक्त) झेरॉक्स खर्चाचा पुनर्भरणा व ग्राहकास प्रस्तुत प्रकरणी झालेल्या मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल भरपाई म्हणून रु.२०००/-(रु. दोन हजार मात्र) दि.१०/०२/२०१५ पूर्वी द्यावे.**

**४) या आदेशाप्रमाणे पूर्तता करुन त्याचा अहवाल दि. २८/०२/२०१५ पर्यंत मंचाकडे पाठवावा.**

**५) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**६) या आदेशाचे महावितरणकडून पालन न झाल्यास वीज कायदा २००३ मधील कलम १४२ नुसार ग्राहक खालील पत्त्यावर तक्रार करु शकतो.**

**पत्ताः- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**१३ वा मजला, केंद्र क्रं. १,**
**जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,**
**कुलाबा मुंबई ४००००५**
**फोन नं.०२२ - २२१६३९६४/६५/६९**

| | |
|---|---|
| **श्री. डी. एस्. जामखेडकर** | **श्री.ज.पु.बिवलकर** |
| **अध्यक्ष** | **सदस्य** |
| **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** | **ग्रातनिमं, कोकण परिमंडल** |

**दिनांक :- २१.०१.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**

मी खाली सही करणार श्री वसंत बापू जगताप कार्यकारी अभियंता तथा या मंचाचा सचिव नात्याने मंचाने प्रस्तुत प्रकरणामध्ये दिलेल्या आदेशातील आदेश क्रं. ३ बाबत मी सहमत नाही.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील विनिमय क्रं. ८.२ (३) मध्ये तक्रारदाराला सहन कराव्या लागलेला तोटा व त्यासंबंधी भरपाईबाबत विवेचन दिलेले असून ते खालीलप्रमाणे आहे.

" ८.२ (३) ग्राहकाला सहन कराया लागलेल्या तोटा किंवा नुकसानाकरिता मंच आदेश देईल तितकी रक्कम ग्राहकाला भरपाई म्हणून देणे.

परंतु तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष,परिणामरुप, आनुषांगिक, दंडात्मक किंवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान, यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही ;"

वरील विनिमयामध्ये ग्राहक कोणत्याही प्रकरणी अप्रत्यक्ष परिणाम स्वरुप अनुशंगीक इ. नुकसानीच्या भरपाई साठीच्या हक्कास पात्र रहाणार नाही असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये महावितरणच्या अवैध कार्यवाहीमुळे तक्रारदारास मनस्ताप झाला व त्यांचा रक्तदाब वाढला, त्यामुळे तक्रारदारानी मानसिक ताणाबाबत भरपाई मागितलेली आहे त्यांची ही मागणी अप्रत्यक्ष परिणाम स्वरुप आहे तसेच याबाबतीत त्यानी कोणताही लेखी पुरावा सादर केलेला नाही त्यामुळे महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ मधील वर नमुद केलेल्या विनिमयानुसार तक्रारदार कोणत्याही परिणाम स्वरुप नुकसान भरपाईस पात्र होऊ शकत नाही सबब तक्रारदारास रु. २०००/- (रु. दोन हजार मात्र) मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल भरपाईबाबत देण्याच्या आदेशाबाबत माझी हरकत आहे.

**श्री. व्ही.बी.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २१.०१.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**